# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत

जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड, क्र. ९, जे.व्ही.पी.डी. स्कीम, जुहू, मुंबई – ४०० ०४९
दुरध्वनी क्र. ०२२-२६२०२८५२

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत मुंबई यांच्या मुख्य कार्यालय, मुंबई येथे केंद्र शासनाच्या पंतप्रधान अनुसूचित जाती अभ्युदय योजना (PM- AJAY) अंतर्गत पायाभूत प्रकल्प (Infrastructure Development) अंमलबजावणीसाठी महामंडळाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयाकरीता, विशेष कार्यअधिकारी तथा तांत्रिक सल्लागार (वर्ग-१) - १ पद, तसेच उपअभियंता (स्थापत्य)/नगररचनाकार (वर्ग-२) - १ पद, व सहाय्यक (स्थापत्य) अभियंता – २ पदे या पदावर १ वर्ष कालावधीकरिता करारतत्वावर भरण्यासाठी सेवानिवृत्त इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>पदाचा तपशिल/शैक्षणिक/तांत्रिक अर्हता</u>:**

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | किमान शैक्षणिक पात्रता | मासिक ठोक परिश्रमिक | आवश्यक पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष कार्यअधिकारी तथा तांत्रिक सल्लागार (वर्ग-१) | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियंता पदवी (B.E. Civil) व पदव्युत्तर पदवी (M.TECH Civil) | दरमहा रु. १,३५,०००/- (वाहनभत्त्यासह) | १.शासकीय/निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या महानगरपालिकेतील अथवा राज्य शासनाचे नगररचना विभागातील सहाय्यक संचालक नगररचना पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव व नगररचनाकार पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.<br>२. पदव्युत्तर पदवी (M.TECH Civil) धारकास विशेष प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | उपअभियंता (स्थापत्य)/नगररचनाकार (वर्ग-२) | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियंता पदवी (B.E. Civil) व पदव्युत्तर पदवी (M.TECH Civil) | दरमहा रु. १,००,०००/- (वाहनभत्त्यासह) | १.शासकीय/निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या महानगरपालिकेतील अथवा राज्य शासनाचे उपअभियंता (स्थापत्य) सार्वजनिक बांधकाम/नगररचना पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सहाय्यक (स्थापत्य) अभियंता | २ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियंता पदवी (B.E. Civil) व पदव्युत्तर पदवी (M.TECH Civil) | दरमहा रु. ७०,०००/- (वाहनभत्त्यासह) | १.शासकीय/निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या महानगरपालिकेतील अथवा राज्य शासनाचे बांधकाम विभागातील सहाय्यक (स्थापत्य) अभियंता पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. |

३. **पात्रता आणि किमान व कमाल वयोमर्यादा** :

(३.१) भारतीय नागरीकत्व (महाराष्ट्राचे अधिवासी) असावे.

(३.२) अर्जदार हा शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणतेही फौजदारी गुन्ह्याचे प्रकरण सुरु/प्रलंबित नसावे.

(३.३) अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी राहील.

**४) वरील पदासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

**अ.** कोणतीही कारणे न देता जाहीरातीमधील रिक्त पदाच्या संख्येत बदल करणे, पदभरती स्थगित करणे / रद्द करणे व पदभरती प्रक्रिया याबाबतचे सर्व अधिकार तसेच प्राप्त अर्ज अंशतः किंवा पूर्ण किंवा सर्व अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

**आ. दिनांक २४/१२/२०२४, रोजी दुपारी ०२.००** वाजता थेट मुलाखत **(Walk In Interview)** मुळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे.

**इ.** मुळ प्रमाणपत्रांच्या छायाप्रती स्वयंसाक्षांकीत (Self Attested) करून एक संच थेट मुलाखत **(Walk In Interview)** च्या वेळी सोबत आणावेत. सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्पष्ट आणि सुवाच्य असाव्यात.

**ई.** मुलाखती **(Walk In Interview)** साठी/चाचणीसाठी उपस्थितीत राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता/ निवास भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

**उ.** वरील पदांबाबत संबंधित अर्जदारांचा त्या क्षेत्रातील अनुभव, ज्ञान, कौशल्य इत्यादीच्या आधारे त्यांच्या मासिक परिश्रमिकामध्ये आपापसातील वाटाघाटीद्वारे वाढ करण्याबाबतचे अधिकार महामंडळ राखून ठेवित आहे.

**ऊ.** वरील पदावरील करारतत्वावरील नियुक्ती म.फु.मा.वि.म.मर्या., यांच्या कार्यालयासाठी आहे.

**ए.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता इत्यादी अर्हता किमान असून ती धारण केली म्हणून उमेदवार निवडीस पात्र असणार नाही. अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र अर्जदारांची अर्हता, उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादीनुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**ऐ.** जाहिरातीत नमूद वरील पद हे महामंडळाचे नियमीत पद नसून सदरील पद निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पद आहे. सदर पदावर नियुक्ती देण्यात येणाऱ्या अर्जदारांना या पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे/महामंडळाचे/कंपनीचे सेवा नियम लागू राहणार नाहीत. त्याचप्रमाणे अर्जदाराला महामंडळामध्ये नियमित सेवेत सामावून घेणे किंवा सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

**ओ.** निवड झालेल्या अर्जदारांची नियुक्ती ही संबंधित उमेदवार त्याची निवड करण्यात आलेल्या पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासून, सुरवतीस १ वर्षासाठी किमान ३ वर्षासाठी वेळोवेळी मुदत वाढ देऊन वय वर्ष ६५ किमान असून प्रकल्पाचे कामकाज विचारात घेता कमाल वय वर्ष ७० पर्यंत कालावधीसाठी राहील.

**औ.** सेवाकराराच्या आधारावर निवडलेल्या उमेदवाराला वर नमूद प्रमाणे दरमहा एकत्रित मानधन दिले जाईल. तसेच महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, गणवेश भत्ता, अतिकालीक भत्ता, वैद्यकीय प्रतिपूर्ती, दूरध्वनी इत्यादी सारखे कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

**अं.** वरीलप्रमाणे निवड करण्यात येणाऱ्या उमेदवाराला सेवाकरार सुरुवातीला १ वर्ष कालावधीसाठी असेल आणि महामंडळाची आवश्यकता, उमेदवाराचे कार्यक्षमतेचे मुल्यांकन आणि त्यांच्या वैद्यकीय तंदुरुस्तीच्या अधीन राहून सदर करार पुढे ३ वर्षापर्यंत वाढवला जाऊ शकतो.

**अः.** सेवाकरार तत्वावर निवडलेल्या उमेदाराना शनिवार/रविवारची सुट्टी आणि नियुक्ती झालेल्या करार कालावधीत आठ दिवसांची नैमितिक रजा अनुज्ञेय आहे. अनुज्ञेय आठ दिवसांहून अधिक काळ गैरहजर राहिल्यास त्यांना सदर गैरहजर कालावधीत कोणतेही मानधन अनुज्ञेय असणार नाही. तसेच करार कालावधीत न उपभोगलेल्या नैमितिक रजा पुढील करार कालावधीत समाविष्ट केल्या जाणार नाहीत किंवा रजा रोखीकरणासाठी पात्र होणार नाहीत.

**ज्ञ.** निवड झालेल्या उमेदाराला देय असलेल्या मानधनावर शासनाच्या नियमानुसार प्राप्तिकर किंवा इतर कोणताही कर TDS द्वारे कपात केला जाईल व त्याबाबतचे आवश्यक TDS प्रमाणपत्र संबंधित अर्जदाराला दिले जाईल.

**टिप – मासिक ठोक परिश्रमिक नियमानुसार आवश्यक बदल करणेत येईल.**

*******

फोटो

# उमेव्दाराची माहिती

| | |
|---|---|
| संपूर्ण नाव | |
| जन्मतारीख | |
| संपर्काचा पत्ता | |
| कायमचा पत्ता | |
| मोबाईल क्र. | |
| ई-मेल | |
| आधार कार्ड क्र. | |
| पॅनकार्ड क्र. | |
| पदाचे नाव | |
| शैक्षणिक पात्रता | |
| तांत्रिक अर्हता / कौशल्य अर्हता | |
| अनुभव | |
| इतर माहिती | |

वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी आहे. मी सादर करीत असलेल्या पदाच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. त्यानुसार हा अर्ज मी सादर करीत आहे. अर्जासोबत वयाचा दाखला, शैक्षणिक/तांत्रिक पात्रता प्रमाणपत्र /अनुभव प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांच्या स्वयंस्वाक्षरी केलेल्या छायाप्रती सोबत जोडल्या आहेत.

**नाव व स्वाक्षरी / दिनांक**